UNIVERSITY OF POONA

Jayakar Library

समाज-स्वास्थ्य.

Vol. 2. Nos. १-१२.

Pages

Months जुलै-जून.

Year १९२८-२९.

POONA UNIVERSITY
JAYAKAR LIBRARY
RARE-BOOK
Kept Separately
Not to be issued out

Y1m2:N27
155F7.2
289532

समाजस्वास्थ्य

वर्ष २ रें

अंक १

जुलै १९२८

संपादक—र. धों. कर्वे

किंमत दोन आणे

अनुक्रमणिका.

विषय.	पृष्ठ.

१.	संततिनियमनावरील कादंबरी (पुढें चालू) ...	१
२.	त्वचा व तिची काळजी	८
३.	संकेतगृहें	१६
४.	पत्रांचा सारांश	१९
५.	नवीन लेखांतील विचार	२३

289532

संततिनियमनाकरितां

'मॅटोरी' वड्या वापरा

डझनाचे नळीस दीड रुपया.

सोल एजंटः—राइट एजन्सी,

२० भटवाडी रस्ता, गिरगांव, मुंबई.

जेलोटयूब

यानें गुप्त रोग बरे होत नाहींत, हें गुप्त रोगांचा प्रतिबंध करण्याकरतां पुरुषांनीं वापरण्याचें औषध आहे. वापरण्यास सुलभ व स्वस्त असून काळजीपूर्वक वापरल्यास रोग होणें शक्य नाहीं. फ्रान्समधील लष्करांतील आरमारांतील व इतर हजारों लोक वापरतात. प्रसिद्ध फ्रेंच डॉक्टर गोडयुशो यांच्या सल्ल्यानें हें औषध एका फ्रेंच कंपनीनें तयार केलें आहे. दोन वेळ वापरण्याचे पेटीस १२ आणे. तीन पेट्यांस रु. २.

संततिनियमनावरील कादंबरी

(पुढे चालू)

स्पिरिता मार्सेल्स येथें एका खालच्या प्रतीच्या होटेलांत उतरली. तिनें लुईज मॅतिय असें नांव धारण केलें ती कांहीं काम मिळालें तर पहावें म्हणून शहरांत हिंडली. कांहीं कांहीं लोक तिच्या पोट कडे पाहून तिला घालवून देत, कांहीं चेहऱ्याकडे पाहून तिला ठेवण्यास तयार होत, परंतु ते आपला उद्देश इतका स्पष्टपणें दर्शवीत कीं ती तेथून निघून जाई. शेवटीं रात्रीं ती रस्ता चुकली व एका वेश्यांच्या रस्त्यांत गेली. एक विवाहित जोडपें शहराची गंमत पाहण्याकरतां चाललें होतें, त्यांचे मागोमाग ती चालली. इतक्यांत एका मुलॅटो (युरोपियन् व नीग्रो यांची संतति) स्त्रीनें त्या जोडप्यास थांबवलें व म्हणालीः-'काय, बाई, गंमत पहायला आलांत ? पहा तर ' असें म्हणत तिनें आपला डगला उघडून दाखवला तों ती आंत नग्न दिसली. तें जोडपें तेथून निसटून जाऊं लागलें तों त्यांना थांबवून म्हणालीः-दोघेंहीं चला, (पुरुषास) म्हणजे तुझी बायको कांहींतरी शिकेल. स्पिरिता तेथून पळाली. कोणाला तरी रस्ता विचारावा म्हणून पाहते तों एका वेश्येनें एका इंग्लिश गृहस्थाची टोपी पळवली, व तो पाहूं लागला तेव्हां म्हणतेः-' ये माझ्या मागून ! तीन फ्रँक दिले म्हणजे टोपी मिळेल आणि सगळं कांहीं मिळेल ! ' तो मनुष्य तिला पांच फ्रँकची नोट देऊन टोपी घेऊन तेथून पळाला. स्पिरिता कशीतरी एकदांची होटेलांत पोंचली.

\+ + +

स्पिरिता आतां अगदीं कृश झाली होती. तिनें एका महिन्यांत चार वेळां बिऱ्हाड बदललें. तिला बाहेर पडण्याची देखील लाज वाटूं लागली. गर्भपात करण्याचे उद्देशानें रोझानें दिलेल्या पत्त्यावर ती गेली, परंतु तेथल्या नर्सनें तिचें पोट पाहून तिला परत पाठवली. तीन महिने अगोदर सहज गर्भपात

करतां आला असता, परंतु आतां धोका फार आहे असें तिनें सांगितलें, व दिवसाला फक्त २० फ्रँक घेऊन बाळंतपण करीन असें म्हणाली. पण ते फक्त २० फ्रँक आणावे कोठून ? एकदां ती एका पानगृहांत नोकरीला राहिली परंतु गिऱ्हाईक जास्त लघळपणा करूं लागल्यावरून तिनें मालकाकडे तक्रार केली. मालक गिऱ्हाइकांस रागें भरला, परंतु दुसरे दिवशीं सकाळींच तिलाही काढून टाकली.

मामाला तिनें पत्र लिहिलें होतें, परंतु पत्ता कळवला नव्हता. पत्ता कळवल्यास तो एकदम निघून येईल व लोकांना बोलायला अधिक जागा होईल, अशी तिला भीति वाटली. शिवाय गर्भपाताचें नच जमल्यास सरकारी इस्पितळांत मूल टाकून जाण्याच्या तिच्या बेताच्या आड तो कदाचित् आला असता.

परंतु जवळचे पैसे संपून जेव्हां जगणें अशक्य झालें, तेव्हां मात्र तिनें त्याला पत्ता कळवून इत्थंभूत हकीकतीचें पत्र लिहिलें. त्यानें तिला ५०० फ्रँक पाठवले, परंतु पायाची शीर दुखत असल्यामुळे त्याला हालणें शक्य नव्हतें. ' तूं इस्पितळांत जाऊन तपासून घे, बाळंतपणापर्यंत मी बरा होऊन येतोंच, मी आपली बदलीही करून घेतों, मग आपण तिघांनीं कोठेंतरी चांगलीशी जागा घेऊन राहूं !' असें त्यानें लिहिलें. पण तिला वाटलें, खाशी युक्ति! आधींच लोक बोलताहेत, मग तर चांगलेंच फावेल !

तिनें स्वतः पैसे मिळविण्याचा प्रयत्न केला, परंतु शरीरविक्रयाशिवाय तिला कोणीही काम देण्यास तयार होईना. अशा स्थितींत ती जीव देण्यासही तयार झाली, परंतु मॅडम् रूस्तां नांवाच्या बाईकडे ती रहात असे तिच्या एल्येनेत् नांवाच्या मुलीशीं तिचें सख्य झालें होतें, तिनें तिला धीर दिला. ती एका अत्तरांच्या दुकानांत नोकरीला होती व शिवाय तिला एका व्यापाऱ्यानें ठेवली होती. तिनें स्पिरिताला तात्त्विक उपदेश केला. ' कांहीं झालें तरी काळजी करूं नये, धीर सोडूं नये. मूल होईल ना ? झालं तर झालं. लोकांना थोडीं का होतात ? काय व्हायचं असेल तें होईल....हे शेजारीं इटॅलिअन कुटुंब नाहीं का ? तो दारू पितो, तीही पिते, आणि मग चालतो धिंगाणा,

दारुड्यांचं प्रेम तें ! परिणाम, पांच मुलं आहेत, सहावं वाटेवर आहे. म्युसोलिनीची चैन आहे !...त्यांत काय आहे ? मला सुद्धां एक मूल झालं. त्याचा बाप कोण होता पहा, माझा अगदीं पहिला प्रियकर, एर्नेस्त–नव्हे जूल–सणाच्या दिवशीं दोघांनींही थोडीशी अधिक घेतली होती, मग काय, चैन ! पण पुढं चैन निसटली, आणि मूल सरकारी इस्पितळांत टाकावं लागलं.

स्पि:—तें कां ?

एल्येनेत:—कां म्हणजे ? जूल्–नव्हे, एर्नेस्त–आम्हांला सोडून गेला, मग काय करणार ? माझ्या अगदीं जिवावर आलं, पण दोघांचं पोट कसं भरणारे ? आणि झालं काय सरकारला पोसायला !

मामाकडचे पैसे संपल्यावर स्पिरितानें सरकारी मदत मागितली होती (गर्भिणी स्त्रियांस फ्रेंच सरकार मदत करतें) व तिला १५ फ्रँक (दीड रुपया) मिळाला होता ! तेवढ्यांत काय होणार ?

स्पि:—बरं त्या मुलाचं पुढं काय झालं ?

ए:—तें सहा महिन्यांनीं मेलं. तें असो म्हणा, पण मी पुनः नाहीं फसणार ! आतां मला अक्कल आली. आणि एकदां तुझी ही भानगड संपली कीं तूं अगदीं निर्धास्त रहा. मी शिकवीन तुला एक दोन युक्त्या.

स्पिरिताला मामानें संततिनियमनावर कांहीं पुस्तकें दिलीं होतीं, परंतु ती पुस्तकी विद्या ! अनुभवाला येईल तेव्हां खरें.

मामानें पाठवलेले पैसे संपले, तेव्हां तिनें घड्याळ गहाण टाकून ५० फ्रँक आणले, व तिला थोडें शिवणकामही मिळालें. कांहीं दिवसांनीं मामाकडून आणखी २०० फ्रँक आले, परंतु पत्रांतील बातमी वाईट होती:–माझा पाय अजून बरा नाहीं. अंथरुणावर खिळून आहें. बरेच दिवस लागतील असें डॉक्टर म्हणतो. तूं आतांच इस्पितळांत जा, बाळंतीण होशील तों मी येतों. मग ठरवूं काय करायचं तें. तुझा भाऊ लष्करांत गेला आहे व बापानें पुनः पडून पाय मोडून घेतला. तुझ्या आईनें व बहिणीनें एका डॉक्टराचे मदतीनें त्याला वेड्यांचे

इस्पितळांत पाठवण्याचा बेत केला आहे. म्हणजे इस्टेट विकायला सांपडेल. तूं इस्पितळांत गेलीस म्हणजे कळव.

× × × +

ती इस्पितळांत पोंचते तों तिला घेरी आली. तेथील डॉक्टरानें तिला गरम पेय देववलें व ठेवून घेण्यास सांगितलें. तिनें आपलें नांव सांगितलें नाहीं तरी तिला कोणताही त्रास झाला नाहीं. नांव न सांगणाऱ्या स्त्रियांच्या वेगळया खोलींत तिला ठेवलें व तिच्या पलंगावर नंबर ५ ची एक चिठ्ठी लावली. पोटांत मूल उलटें होतें, परंतु इस्पितळांत लवकर गेल्यामुळें सर्व कांहीं सुरळीत होईल, असें नर्सनें सांगितलें.

तिला सध्यां तरी पोटाची काळजी राहिली नाहीं, व विश्रांती मिळाल्यामुळें ती बरीच शांत झाली. तेथील इतर स्त्रियांची व तिची ओळख झाली. सर्वांस नंबरच होते.

नंबर ४ ला जुळीं होणार असें कळलें होतें.

नं. ४:—बरं झालं मी नांव नाहीं दिलं म्हणून. आम्हांला आधींच चार मुलं आहेत आणि यजमान पडले क्षयी. मी एकटी किती जणांना पोसणार ? हीं दोन मुलं मी इथे टाकून जाणार. म्हणून तर मी नांव सांगितलं नाहीं. नाहीतर तीं गळ्यांत पडणार. सरकारला लढाईकरतां मुलं पाहिजेत ना ? त्यांनीं पोसावीं पाहिजे तर.

नं. ८:—पण त्यापेक्षां आधींच सावध राहिलं तर ?

नं. ४:—बोलायला सोपं असतं ? पण सगळेच नवरे कबूल नाहीं करीत. आणि मग आपण हो कां आलांत इथे बाईसाहेब ?

नं. ८:—मी फसलें. हो, आठ वर्षं लग्नाला झालीं, अजून कध्धीं मूल झालं नाहीं. आतांच होईल हें कसं भाकीत करावं ?

स्त्रिः—मग काय, तुम्हांला मुलींच मुलं नकोत ?

नं.८:—तसंच कांहीं कारण असलं तर ?

तिचा नवरा गलबताचा कप्तान असून त्याला घर सोडून १० महिने झाले होते. अशा वेळीं मूल होऊन कसं चालेल? सगळंच बाहेर फुटायचं!

नं. ४ ला व स्पिरिताला तेथील नर्सेनें व डॉक्टरानें पुष्कळ उपदेश केला परंतु मुलें टाकून जाण्याचा त्यांचा निश्चय ढळेना.

न. १० ही एक श्रीमंताची मुलगी हिंदुस्थानांत प्रवास करण्याचे मिषानें घरून निघून या इस्पितळांत आली होती.

*　　*　　*　　*

स्पिरिताची वेळ जवळ आली. तिनें इतरांसारखें आपण ओरडावयाचें नाहीं म्हणून ठाम निश्चय केला होता, परंतु तो टिकला नाहीं. तीही ओरडूं लागली. तिला दुसऱ्या खोलींत नेली. तेथील चार पलंगांपैकीं एकच रिकामा होता, बाकीच्यांवर तीन स्त्रिया ओरडत पडल्या होत्या. स्पिरिताच्या शेजारच्या बिछान्यावर एक अर्धनग्न स्त्री होती. तिचें प्रचंड पोट व वर उचलून मागें बांधून टाकलेले पाय, एवढेंच काय तें स्पिरिताला दिसलें. ती एकदां घर हादरण्याइतक्या मोठ्यानें ओरडली व नंतर गप झाली. नर्स म्हणाली:— मुलगा झाला!

नंतर तिची पाळी आली, व पशूंमधें व आपणामधें कांहीं अंतर नाहीं असें तिला कांहीं वेळ तरी वाटलें! नंतर नर्स म्हणाली:—पहा तर खरा, किती सुरेख आहे तो! पण तिनें कपाळाला आंठ्या घालून डोकें फिरवलें.

नर्स:—आज त्याला साखरेचं पाणीच पाजायचं, पण उद्यांपासून दूध पाजलं पाहिजे.

असें म्हणून तिनें मुलाला बिछान्यावर ठेवलें, पण स्पिरितानें त्याला बाजूला सारलें.

स्पि:—मी पाजणार नाहीं.

नर्स:—पण पहा तर खरा, तो अगदीं तुझ्यासारखा दिसतो आहे. अन् तुझ्यासारखे स्तन असून पाजीत नाहीं म्हणजे काय?

स्पि:—(संतापून) मला नको आहे. घेऊन जा त्याला.

दूध आल्यावर त्रास होऊं लागला म्हणजे आपोआप पाजील, असा विचार

करून नर्स मुलाला घेऊन गेली. जन्माची नोंद करतांना मुलाला नांव काय द्यावयाचें, हें सुद्धां स्पिरिता सांगेना. मी मुलाला टाकणार, तुम्ही हवं तें करा, असें तिनें सांगितलें. शेवटीं मुलाला मार्क असें नांव दिलें. दुधानें स्तन फुगून त्रास होऊं लागला, तरी ती मुलाला पाजीना. त्यामुळें ताप आला, तेव्हां नर्सनें यंत्रानें दूध काढलें, पण तिनें आपला हट्ट सोडला नाहीं.

पंधरा दिवसांनीं ती मुलाला घेऊन तेथून घरीं आली. त्याला सरकारी अनाथगृहांत ठेवण्याचा तिचा ठाम निश्चय तडीस गेला नाहीं. आज जाऊं, उद्यां जाऊं, असें होत होत मुलगा तिच्या जवळच राहिला. परंतु तिला आतां दूध येत नव्हतें, व मामानें आणखी १०० फ्रँक पाठविले होते ते केव्हांच संपून गेले. तिला आतां मुलाची दया येऊं लागली, तरीपण एकदां चुंबन घेण्याकरितां म्हणून तोंड जवळ नेतांच तिला त्याच्या बापाची आठवण होऊन ती एकदम मागें सरली. तो भुकेनें ओरडूं लागला, परंतु देणार काय? पाण्यांत थोडी साखर घालून तिनें त्याला दिलें, व आपली मैत्रीण एत्येनेत हिच्याकडे कांहीं पैसे मागण्याचे हेतुनें गेली. परंतु तिनें नोकरी सोडली होती व ती ओकत होती. स्पिरितानें कारण विचारतांच ती गर्भार होती असें समजलें.

एः—एकदां कुठें मी ढाल बरोबर न्यायला विसरलें, तों झालेंच! मी जर काळजी घेतली नसती, तर आपलें दरवर्षी मूल! काय ताप आहे!

गर्भपाताच्या उद्देशानें तिला आईनें सकाळीं कसल्याशा मुळीचा काढा दिला होता पण कांहीं उपयोग झाला नाहीं.

तिचें ओकणें व आईचें चडफडणें यापुढें पैसे मागण्याचा स्पिरिताला धीर झाला नाहीं. ती काम शोधण्याला म्हणून बाहेर निघाली. सिमाँ बेर्टु नांवाच्या एका खलाशानें तिला एकदां निरपेक्ष बुद्धीनें पैसे उसने दिले होते, तो पुनः भेटला तर पहावा हाही तिचा उद्देश होता. पण तो कोठेंच दिसेना. शेवटीं तो दोन दिवसांपुरता सफरीला गेला असें समजलें.

जाहिरातींतील कांहीं पत्ते उतरून घेऊन ती काम पहावयास निघाली. पहिला पत्ता एका संकेतगृहाचा होता. कोणाही स्त्रीपुरुषांस एकांत पाहिजे

असल्यास तेवढ्यापुरत्या सोईवार खोल्या संकेतगृहांत मिळतात. तेथें बिछाने वगैरे घालण्याचें मुख्य काम होतें, परंतु तेथें कोणी एकटाच पुरुष आल्यास त्याचीही सोय करावी लागेल असें जेव्हां तिला कळलें, तेव्हां ती तेथून पळाली. शेवटीं हिंडतां हिंडतां ती इतकी दमली कीं एके ठिकाणीं भिकाऱ्यांना अन्न वांटीत होते तेथें जाऊन अन्न घेऊन आली. तेथें एका मनुष्यास दया येऊन त्यानें तिला कांहीं पैसेही दिले, त्याचें तिन मुलाकरतां दूध आणलें त्याला बिचाऱ्याला आतां रडण्याची देखील शक्ति नव्हती. ती दूध देऊं लागली पण तो पिईना. दुध नासलें होतें.

आतां हें मूल भुकेनें मरणार अशी खात्री झाल्याबरोबर ती लगेच उठली. व त्याला सरकारी अनाथगृहांत पोंचवून आली. त्याची कांहीं तरी बातमी मिळावी म्हणून तिला आपलें नांव सांगणें भाग पडलें. पण मूल आपलेंच असें तिनें सांगितलें नाहीं. (अपूर्ण)

वेश्यांनीं रस्त्यांत गिऱ्हाइक मिळवण्याचे उद्देशानें पुरुषांशीं बोलूं नये असा इंग्लंडांत (व येथेंही) कायदा आहे. व त्यामुळें पोलिसाकडून वेश्यांस विनाकारण त्रास होण्याचा संभव असतो. हा कायदा बदलून, केवळ एखाद्यास अनीतीकरतां आव्हान करणें हा गुन्हा न समजतां, त्यापासून कोणास त्रास झाला असा पुरावा असेल तरच गुन्हा समजावा, असें लॉर्ड बाल्फर यांचं म्हणणें आहे. आमचेंही असेंच मत आहे.

× × × ×

रतिलाल नांवाच्या १८ वर्षांच्या मुलाला कांहीं साधूंनीं फूस लावून नेऊन साधु बनविला होता. परंतु त्याच्या १५ वर्षांच्या बायकोनें इतर लोकांच्या मदतीनें त्याचा तपास लावून त्याला साधूंपासून सोडवून आणला. शाबास !

× × × ×

त्वचा व तिची काळजी

त्वचा हें स्पर्शेंद्रिय असून शिवाय तिनें शरीराचें संरक्षण होतें. तिचें महत्व इतकें आहे कीं त्वचेचा बराच भाग भाजल्यास मृत्यू येतो.

त्वचेमध्यें दोन थर असतात. बाहेरील थर म्हणजे बाह्यत्वचा, व आंतील अंतस्त्वचा. या अंतस्त्वचेंत, सूक्ष्मदर्शक यंत्रांतून पाहिल्यास, रक्त-वाहिन्याचें एक जाळें पसरलेलें दिसतें. यांतीलच स्वेदोत्पादक ग्रंथींतून घाम येतो व केंसांच्या मुळाशीं असलेल्या स्नेहोत्पादक ग्रंथींतून केंसांस तुकतुकी आणणारें तेल येतें. शिवाय याच अंतस्त्वचेंत मज्जातंतूंचें एक जाळें बनलेलें असतें, त्यामुळें त्वचेस स्पर्शज्ञान होतें, म्हणजे एखाद्या पदार्थाची उष्णता, त्याचा आकार, कठिनता वगैरेचा बोध होतो. त्वचेकडे इतकें महत्त्वाचें काम असतांही त्वचेची योग्य काळजी फारच थोडे लोक घेतात.

त्वचेनें शरीरसंरक्षण दोन प्रकारांनीं होतें. हवा, धूळ व इतर पदार्थांमुळें जे रोगजंतु त्वचेवर बसतात ते अखंड त्वचेंतून शरीरांत जाऊं शकत नाहींत. त्वचेचा वरील थर हळूहळू निघून जाऊन त्याचे जागीं आंतील नवीन थर येत असतो. या वरील थराबरोबरच त्यास लागलेली धूळ व जंतु पडून जाऊन त्वचा स्वच्छ होते, व साबणानें व गरम पाण्यानें धुतल्यानें या नैसर्गिक स्वच्छतेस मदत होते.

याशिवाय त्वचेमुळें थंडी व उष्णतेपासून आपला बचाव होतो. त्वचेंतील सूक्ष्म रक्तवाहिन्या थंडीनें संकोच व उष्णतेनें विस्तार पावतात. यामुळें थंडीचे वेळीं त्वचेंतील रक्त कमी होऊन त्वचा फिकट होते व रक्तांतील उष्णता हवेंत पसरण्याचें प्रमाण कमी होतें. उन्हाळ्यांत त्वचा लाल होते व रक्तवाहिन्यांतील रक्त बाहेरील हवेच्या स्पर्शानें थंड होतें. [अर्थात् शरीरापेक्षां हवेची उष्णता

अधिक असल्यास असा परिणाम होणार नाहीं.] शिवाय अधिक उष्णतेमुळें अधिक घाम येऊन त्याची वाफ होण्याकडे बरीच उष्णता खर्च होते व त्यामुळें थंडावा येतो. यामुळें निरोगी शरीराची उष्णता नेहमीं जवळ जवळ सारखीच राहते. घामाचा आणखी असा उपयोग आहे कीं शरीरांतील निरुपयोगी व हानिकारक पदार्थ घामाबरोबर बाहेर पडल्यामुळें मूत्रपिंडांचें व फुप्फुसांचें काम त्या मानानें हलकें होतें.

नित्यक्रमः—शरीराचे जे भाग उघडे असतात त्यांवर धूळ वगैरे बसून ते खराब होतात, व निजण्यापूर्वी ते स्वच्छ धुण्याची जरूर असते. सामान्य नियम म्हणजे गरम पाणी व साबणानें हात, पाय व तोंड धुवावें. विशेषतः ज्यांची त्वचा तेलकट दिसत असेल त्यांनीं तोंड धुण्यास होतां होईल तों थंड पाणी वापरूं नये. गरम पाण्यानें त्वचा अधिक स्वच्छ होते. ज्यांची त्वचा रूक्ष असते त्यांनीं धुतल्यानंतर एखादी 'क्रीम' लावणें बरं. कांहीं लोकांच्या त्वचेस साबण सोसत नाहीं त्यांनीं व्हॅसेलीन् लावून नंतर फडक्यानें पुसून टाकल्यास त्वचा स्वच्छ होईल, गोड्या बदामांचे तेल किंवा कोलन् वॉटरनेंही हें काम होतें.

स्नानः—हिंदुस्थानांत स्नानाचा प्रघात जरी सार्वत्रिक आहे, तरी स्नानाबद्दल बऱ्याच विचित्र कल्पना दृष्टीस पडतात. अंगावर दोन तांब्ये पाणी ओतलें म्हणजे पुष्कळ लोकांचें स्नान होतें. अंगावरील वस्त्र भिजलें पाहिजे अशी सोंवळया ब्राह्मणांची कल्पना असते. परंतु अंग स्वच्छ झालें पाहिजे ही कल्पना क्वचितच दिसते. शरीराचें प्रत्येक छिद्र रोगजंतूंस शरीरांत जाण्यास वाट होऊं शकतें. म्हणून नाक, कान, तोंड, डोळे, मूत्रद्वार, गुदद्वार, व जननेंद्रिय स्वच्छ ठेवण्याची विशेष खबरदारी घेणें जरूर असतें. स्नान करतांना अंगावर वस्त्र असलें पाहिजे ही कल्पना कदाचित् धार्मिक असेल, परंतु गलिच्छपणास पोषक आहे. सर्वांग स्वच्छ धुणें असेल तर स्नान नग्न स्थितींतच केलें पाहिजे, व याकरतां प्रत्येक घरांत स्वतंत्र खोली असल्यास उत्तमच, परंतु नसल्यास कांहींतरी तजवीज केली पाहिजे. जेथें विशेष घाम येतो तेथें दररोज साबण

लावणें जरूर आहे, व आठवडयांतून एक दोन वेळां तरी सर्वांग साबण लावून धुणें जरूर आहे. ज्यांना थंड पाणी सोसेल त्यानीं थंड पाण्यानें स्नान करणें चांगलें, परंतु आठवडयांतुन एक दोन दिवस तरी गरम पाणी वापरावें.

पाय:-बूट, मोजे वापरणारांचे पाय घामानें व इतरांचे मातीनें खराब होतात, व ते दररोज स्वच्छ धुणें जरूर आहे. सुती मोज्यांपेक्षां लोंकरीचे मोजे--उन्हाळयांत पातळ व हिंवाळयांत जाड--वापरणें बरें, म्हणजे घामानें त्रास कमी होईल. मोजे वारंवार धुतले पाहिजेत. बूट पायांस बरोबर बसतील असे घालावे, तसे नसल्यास घट्टे पडून व फोड येऊन अतिशय त्रास होतो. बुटाचें टोंक अरुंद असल्यास व आंगठ्याचें नख बरोबर न कापल्यास कधीं कधीं तें वाढतांना त्वचेंत शिरतें. असें वाढलेलें टोंक कापून काढून त्याचे व त्वचेचे मध्यें कापूस घालुन ठेवल्यास तें आंत शिरणार नाहीं. पायांस घाम फार येत असल्यास मोज्यांत थोडीशी टाल्क् पावडर, किंवा बोरिक पावडर किंवा चेहऱ्यास लावण्याची पावडर टाकावी.

केंस:--जेथें धूळ किंवा केर उडण्याचा संभव असेल, तेथें केंसांवर आच्छादन घालावें. सायंकाळीं केंसांस हवा लागण्याकरतां स्त्रियांनीं केंस मोकळे सोडावे, व नंतर ब्रशानें विंचरून सैल बांधून ठेवावे. सकाळीं पुनः सोडून बांधावे. केंस कोणत्याही पद्धतीनें बांधले तरी कधींही घट्ट बांधूं नये, व त्यांत फारसे आंकडे, फण्या वगैरे घालूं नये. सामान्यतः केंसांस तेल वगैरे लावण्याची जरूरी नसते.

महिन्यांतून एक दोन वेळां केंस धुवावे. ते गरम पाण्यानें धुवावे, परंतु तें फार गरम असूं नये. कोणताही चांगला साबण, किंवा डोकें धुण्याकरतां विशेष प्रकारचे पातळ साबण मिळतात ते वापरावे. साबणाचा अंश डोक्यांत शिल्लक राहूं नये म्हणून शेवटीं पाण्यांत लिंबाचा रस पिळून त्यानें केंस धुवावे. नंतर साध्या टुवालानें पुसावे, कारण टर्किश टुवाल वापरल्यास त्याचीं सुतें केंसांत गुंतुन राहतात.

केंस वाळवण्याकरतां जरूरीप्रमाणें थंड किंवा उष्ण हवेचा प्रवाह केंसां-

वर सोडण्याकरतां विजेचें यंत्र मिळतें त्याचा फार उपयोग होतो व त्यानें केंस तावडतोब वाळतात. केंस पक्के कोरडे होईपर्यंत मोकळेच ठेवावे. विंचरण्याच्या फणीचे दांते फार जवळ जवळ असूं नये, नाहींतर केंस तुटून डोक्याचे त्वचेस त्रास होतो. केंसांच्या टोंकांस फांट्या फुटूं लागल्यास टोंकें कापावीं.

शाळेंत किंवा इतर ठिकाणीं जेथें मुलांचा जमाव होतो तेथें एकापासून दुसऱ्याच्या केंसांत उवा जाण्याचा संभव असतो. नुसतें गलिच्छ राहण्यानेंही उवा होत नाहींत, त्या बाहेरून कोठून तरी केंसांत जातात व तेथें अंडीं घालतात. अशा रीतीनें एक मादी दोन महिन्यांत १८००० अंडीं घालूं शकते. यांस लिखा म्हणतात. डोक्यांत उवा पडल्यास शिरका गरम करून त्यानें केंस धुवावे; म्हणजे उवा व लिखाही मरतात. केंसांत इतर कांहीं रोग झाल्यास डॉक्टरकडे जाणें बरें.

कानः—कानांत जो मेणासारखा चिकट पदार्थ उत्पन्न होत असतो त्याचे योगानें कानाच्या पडद्याचें थंडीवाऱ्यापासुन व अपायकारक आवाजांपासुन संरक्षण होतें, म्हणून हा पदार्थ अजीबात काढून टाकण्याचा प्रयत्न करूं नये. परंतु हा फार सांचल्यास कमी ऐकूं येण्याचा संभव आहे. कान साफ करण्याकरतां कानांत कोणतेंही टोंकदार हत्यार घालूं नये, कारण कान फुटण्याचा संभव असतो. कान धुणें झाल्यास तो कानाच्या पिचकारीनें उकळलेल्या पाण्यानें धुवावा. या पाण्यांत थोडें बोरिक ॲसिड् घालावें. असें केल्यास करांगुळीनें (यास फ्रेंचमधें कानांत घालण्याचें बोट असें नांव पडलें आहे) कान खाजविण्याची जरूर पडणार नाहीं.

नाक व घसाः—नाक स्वच्छ ठेवणें बरेंच कठिण असतें. नाकाच्या आंतील भाग साफ नसतो, व तेथें पुष्कळ केंस व रक्तवाहिन्या असतात, व येथील ग्रन्थींतून येणारा द्रव नेहमीं थोडाबहुत बाहेर येत असतो. कधींकधीं सरदीनें हा द्रव जास्त येतो, कधींकधीं रक्त येतें, व कधीं केंसांच्या मुळांशीं दाह होतो. कधींकधीं तर नाकपुड्यांची रचना बरोबर नसल्यामुळें नाकांतील

स्त्रव नाकांतच राहून कुजूं लागतो व घाण येऊं लागते. नाक, तोंडाचा मागचा भाग, घसा व कान या सर्वांचा निकट संबंध असतो व नाकांत रोगजंतूंची वाढ झाल्यास ते नाकांत, घशांत व तेथून फुप्फुसांपर्यंतही पोंचण्याचा संभव असतो. यामुळेंच पडसें झाल्यानंतर त्याची काळजी न घेतल्यास खोकला होतो.

हवेंतील सर्व केर, जंतु वगैरे श्वासाबरोबर फुप्फुसांत न जातां ते किंवा निदान त्यांतील बराच अंश नाकांत अडकून बसतो. याकरतां दररोज सकाळीं व संध्याकाळीं दोन्ही नाकपुडया स्वच्छ कराव्या. एक ग्लासभर पाणी घेऊन त्यांत थोडें स्वच्छ मीठ विरवावें व तें पाणी नाकांत ओढावें. असें केल्यास या पाण्याबरोबर नाकांतील केर आपोआप धुऊन निघेल. नंतर नाक शिंकरल्यास स्वच्छ होईल.

बारा पासून सतरा वर्षें वयाच्या मुलांच्या नाकांतून पुष्कळ वेळां रक्त येतें. डोकें वर करून कापसाचा बोळा गार पाण्यांत बुडवून नाकपुडींत घातल्यास रक्त बहुतकरून थांबतें. बर्फ मिळाल्यास त्याचा लहानसा तुकडा नाकपुडींत घालून वितळूं द्यावा. इतकेंही करून न जमल्यास कोरडया कापसांत थोडेसें 'ॲन्टीपिरीन्' गुंडाळून त्याची सुरळी नाकपुडींत घालावी. यानेंही न थांबल्यास मात्र डॉक्टरास बोलवावें.

नाकांत व घशांत सुरुवात होणाऱ्या रोगांची यादी बरीच लांब होईल. हे सर्व टाळण्याकरतां सकाळीं, सायंकाळीं व प्रत्येक जेवणानंतर पाण्याच्या गुळण्या करून तोंड व घसा साफ धुतला पाहिजे. पाणी उकळून वापरावें किंवा पाण्यांत थोडें 'हायड्रोजन् पेरॉक्साइड' घालावें. असें केल्यानें पुष्कळ सांथींपासून बचाव होतो.

तोंड व दांतः—चेहऱ्याच्या साफसफाई पेक्षां तोंड व दांत स्वच्छ करणें जास्त महत्त्वाचें आहे, कारण तोंडांत खाद्यपेयाचा अंश शिल्लक राहिल्यामुळें रोगजतूंस वाढण्यास हें उत्तम स्थान होतें, व शिवाय अस्वच्छ तोंडास घाण येते. दांत दररोज साफ न केल्यास कालांतरानें त्यांवर कीट बसतें व ते किडण्यास मदत होते. दांत घासण्याची संवय लहानपणापासून आईबापांनीं

लावली पाहिजे. ते प्रत्येक जेवणानंतर घासलेले उत्तम, परंतु दिवसांतून एकदांच घांसणें असेल तर ते सायंकाळीं निजण्यापूर्वी घांसावे.

दांत घासण्याचा ब्रश फार मऊ नसावा, व दांत ब्रशानेंच चांगले दाबून घासावे. बोटानें दांत स्वच्छ होत नाहींत. ब्रश स्वतःचा वेगळा असावा व तो इतर कोणींही वापरतां कामा नये. ब्रशाचे केंस दांतांचे फटींत शिरतील अशा रीतीनें दांत प्रत्येक वेळीं निदान तीन चार मिनिटें घांशींत बसावें. संवय होईपर्यंत मिनिटें घड्याळानें मोजावीं, मनानें मोजूं नये. दंतमंजन कोणत्याही प्रकारचें वापरलें तरी हरकत नाहीं, त्याचें विशेष महत्त्व नाहीं, ब्रशाचें महत्त्व जास्त आहे. त्याचे केंस झिजून गेल्यावर तसाच वापरूं नये, दुसरा घ्यावा. दांतांची आंतली बाजू बरोबर घांसण्याची खबरदारी घ्यावी. दांत घांसल्यावर तोंड कोमट पाण्यानें खळखळून धुवावें व ब्रश स्वच्छ करून ठेवावा. दांत दिवसांतून दोनदां घांसावयाचे असल्यास दोन ब्रश वापरणें बरें, म्हणजे ब्रश नेहमीं ओला रहात नाहीं. वर्षांतून एकदां दांतांचे डॉक्टराकडून तपासून घ्यावें म्हणजे तो जरूर असल्यास दांतांवरील कीट खरवडून काढतो किंवा अर्धवट किडलेल्या दातांस उपाय करतो. तापानंतर कोणाचे ओंठावर पुटकुळया उठतात, त्या आपोआप बऱ्या होतात, परंतु त्यांत रोगजंतु जाऊं देऊं नये. त्यांस औषध लावण्याचें कारण नसतें.

त्वचेचे रोगः-गळवें व मुरूमः—कांहीं प्रकारचे जंतु त्वचेवर अति जलद वाढतात. हे संधि सांपडल्यास केसांच्या मुळांत शिरून त्यामुळे गळवें वगैरे होतात. त्वचा खाजविण्यानें, विशेषतः अस्वच्छ नखांनीं खाजवण्यानें हे जंतु त्वचेंत शिरण्यास मदत होते, परंतु कधीं कधीं स्वच्छतेस जपणाऱ्या लोकांसही गळवें होतात. हीं प्रथमतः ज्या ठिकाणीं घट्ट कपडे किंवा कमरपट्टा वगैरेमुळे घर्षण होतें तेथें होतात व तेथून पसरत जातात. आरंभींच-गळवाच्या सुरवातीस—उपाय केल्यास व्हॅसेलीन व आयोडीनच्या मिश्रणानें तें बरें होतें, परंतु न झाल्यास पक्क होऊं देऊन तें कापावें लागतें. त्यांतील पुवाचे योगानें दुसरीं गळवें होऊं नये म्हणून त्यावर पट्टी वगैरे बांधणें ती डॉक्टरनेंच बांधलेली

बरी. तीं एकदां पसरल्यास बरीं होण्यास बरेच दिवस लागतात. परंतु याकरतां पोटांत कांहींही औषध घेण्याची जरूर नसते.

सामान्यतः चवदा पासून वीस वर्षांपर्यंत वयाच्या मुलांमुलींच्या चेहऱ्यावर मुरमाच्या पुळ्या उठतात. या कधीं कधीं मानेवर, स्तनांचे मधें, पोटावर व पाठीवरही उठतात. हा त्वचेंतील स्नेहोत्पादक ग्रंथींचा रोग आहे. यावर प्रकृतीचे मान पाहून वेगवेगळे उपाय करावे लागतात, ते डॉक्टराचे सल्ल्यानें करावे. दिवसांतून दोनदां पाण्यांत कोलन वॉटर घालून तें लावावें, व एकदां अतिसौम्य साबणानें धुवावें. अशा वेळीं नुसतें औषध घेऊन भागत नाहीं, खाण्यापिण्यास विशेष जपावें लागतें. त्वचेचे बरेच रोग अन्नपाण्याच्या गैरव्यवस्थेमुळें होतात, त्यांवर डॉक्टरचा सल्ला घेणें बरें.

त्वचेवर राहणारे प्राणी:-खरजेचे किडे, उवा, पिसवा, ढकूण यांमुळें त्वचेसच त्रास होतो असें नाहीं, परंतु क्षयासारख्या रोगांचा संसर्ग यांचे योगानें होऊं शकतो.

खरूज सर्वांत माहीत आहे, ती एका विशिष्ट प्राण्यापासून होते. हा प्राणी विशेषतः मनगट, तळहात, बोटं व बेचकें, कोंपर, खांक वगैरे ठिकाणीं राहतो. आंग खाजविल्यानें तो सर्वत्र पसरतो. याची मादी त्वचेस एक भेग पाडते, व अंडीं घालीत पुढें पुढें पोंखरीत जाते. क्षय, धांवरें व गळवें यांचा संसर्ग यापासून होऊं शकतो. खरजेचा संसर्ग विशेषतः रात्रीचे वेळीं होतो, याकरतां अंथरुणाची व कपड्यांची विशेष खबरदारी घेतली पाहिजे. कोठेंही निजण्याचा प्रसंग आला तरी चादर व उशी स्वतःची असावी.

खरजेस सर्वांत सोपा उपाय म्हणजे निजते वेळीं सर्व अंगास राकेल तेल लावावें व रात्रभर तसेंच राहूं द्यावें. सकाळीं साबणानें धुवावें व संध्याकाळीं फिरून लावावें; याप्रमाणें तीन दिवस केल्यास खरूज बरी होते. नंतर सर्व कपडे उकळून काढावे. राकेल लावण्यापूर्वीं खरजेचे फोड फोडले पाहिजेत;

व एका घरांत पुष्कळ माणसांस खरूज झाली असल्यास सर्वांनीं हा उपाय एकदम केला पाहिजे.

घाणेरड्या माणसांच्या अंगावरही उवांसारखाच एक प्राणी राहतो, परंतु तो बहुधा कपड्यांत राहून संधि साधेल तेव्हां रक्त शोषण करतो. हा चुकून एकादे वेळीं कपड्यांत शिरल्यास कपडे बदलून ते कपडे उकळून काढावे. ज्यांस धंद्यामुळें किंवा इतर कारणांनीं घाणेरड्या लोकांचा सहवास घडतो त्यांनीं यास विशेष जपलें पाहिजे.

पिसवा सर्वांस माहीत आहेत. उंदरांच्या अंगावरच्या पिसवांमुळें प्लेगचा संसर्ग माणसांस होतो, व तो नंतर मनुष्याच्या अंगावरच्या पिसवांमुळेंही जास्त पसरूं शकतो. पिसू अंधाऱ्या कोंपऱ्यांत व घाणेरड्या कपड्यांत अंडीं घालते. स्वच्छतेनें यांस जागा नाहींशी होते. याकरतां कपडे धुवावे, व जमीनींतील व भिंतींतील भेगा भरून काढाव्या.

ढेंकूणही सर्वांच्या चांगले माहितीचे आहेत. ढेंकूण राकेल तेलानें मरतात, परंतु ढेंकणांचीं अंडीं मारणें अतिशय कठिण असतें. फार ढेंकूण झाल्यास भिंतींतील, जमीनींतील व लांकडांतील सर्व फटी बुजवणें व लांकडाचें सामान (खुर्च्या, पलंग वगैरे) 'कॉस्टिक् पोटॅश'च्या पाण्यांत बुडवणें एवढाच उपाय आहे.

राव साहेब कोरडे एम्. एल्. सी. यांचा मुलगा रामराव याचे लग्नाकरतां मंडळी मूर्तिजापुराहून नाशिकला जावयास निघाली, परंतु मुलानें मुद्दाम मागें राहून स्टेशनाजवळील बागेंत विष खाऊन जीव दिला. रामराव नुकताच बी. एस्. सी. ची परीक्षा पास झाला होता, व आपण जीव कां दिला हें त्यानें बापाला पत्रांत लिहून ठेवलें असें म्हणतात.

× × +

१२ मे रोजीं गिरगांवांत विल्सन रस्त्यांतील एका भंग्याच्या गल्लींत एका तान्ह्या मुलीचें प्रेत सांपडलें. तरी संततिनियमन नकोच !

× × ×

संकेतगृहें

(लिहून आलेला मजकूर)

संध्याकाळीं ७।८ वाजण्याचे पुढें वेश्या रहात असलेल्या शहराच्या भागांतून जातांना सामाजिक हितासंबंधींची थोडीबहुत तरी कळकळ वाटणाऱ्या कोणत्याही व्यक्तीचें हृदय द्रवल्याशिवाय राहाणार नाहीं. मुंबईस फोरास रोड, फाकलंड रोड व त्या बाजूचे इतर भाग यांमधून पायींच काय पण ट्रॅममधून किंवा गाडींतून जाणाऱ्या माणसाच्या मनांत देखील रस्त्यांतून जाणाऱ्या व्यक्तीचे पोषाख, हावभाव व भाषा, व खिडक्यांतून आणि गजांच्या आडून रस्त्यावरील पुरुषांची मनें आकर्षून घेऊं पहाणाऱ्या वेश्यांचे समूह, हीं सर्व पाहून आपण ज्या मनुष्यजातीचे एक घटक आहोंत त्याच जातींत ही मंडळीही मोडते हा विचार मनांत येईल व आपल्या सामाजिक रचनेंत काय चुकतें आहे हें शोधून काढण्याकडे त्याची प्रवृत्ति झाल्यास नवल नाहीं. हा वर वर्णन केलेला सर्व प्रकार फार उत्तम आहे व त्यांत कांहीं एक वाईट नाहीं असें बहुधा कोणालाच वाटत नसेल अशी प्रस्तुत लेखकाची समजूत आहे; पण कित्येकांना जर फक्त त्यांतील अश्लीलपणा, गलिच्छपणा व दारिद्र्य हेंच वाईट वाटलें तर दुसऱ्या कित्येकांना वेश्यागमन हें कृत्यच मुळीं मुळापासून वाईट आहे असें वाटेल, एवढाच कायतो फरक.

हीन दर्जाची संतति उत्पन्न करून अथवा सांसर्गिक रोगांचा फैलाव करून दोन व्यक्ती ज्या वेळीं समाजस्वास्थ्याचा बिघाड करतील त्याच वेळीं फक्त त्यांच्या स्वतंत्रतेला आळा घालण्याचा समाजाला अधिकार राहील. या दोन्ही गोष्टींत जर त्यांनीं योग्य ती खबरदारी घेतली तर मग वयांत आलेल्या कोणत्याही दोन स्त्रीपुरुषांना स्वतःच्या शरीराचा हवा तसा उपयोग करण्याची मोकळीक असली पाहिजे. अर्थात् कोणत्याही स्त्रीला तिसऱ्याच एकाद्या

व्यक्तीनें आपल्या शरीराचा विक्रय करण्यास भाग पाडतां कामा नये, व ही गोष्ट आतां कायद्यानें बहुतेक देशांत मान्य केलेली आहे. पण तिची स्वतःचीच इच्छा जर आपल्या शरीराचा विक्रय करण्याची असेल तर मग वरील दोन कारणांखेरीज दुसऱ्या कोणत्याही कारणाकरितां समाजाला—कायद्याला—त्यांत ढवळाढवळ करितां येणार नाहीं.

हें सर्व जरी खरें असलें तरी मुंबई किंवा कलकत्ता यांसारख्या मोठ्या शहरांतुनच काय पण दाट वस्तीच्या लहान लहान शहरांतून देखील वर वर्णन केल्यासारखे जे प्रकार रोज दिसतात ते मोठेसे इष्ट आहेत असे नाहीं. तहान, भूक इत्यादीप्रमाणेंच पण त्यापेक्षांही कित्येक वेळीं अतिशय महत्त्वाची, अशी कामप्रवृत्ति प्रत्येक सामान्य स्त्रींत व पुरुषांत असते, आणि पाणी पिण्यास जसें स्वच्छ भांडें आपल्याला हवेंसें वाटतें किंवा जेवायची जागा ज्याप्रमाणें नुसती स्वच्छच नव्हे तर शक्य तितकी प्रसन्न व सुशोभित असावी अशी आपण काळजी घेतों, त्याचप्रमाणे कामेच्छा जेथें तृप्त केली जाते ती जागाही सुशोभित व शक्य तितकी सुंदर असणें इष्ट आहे. कामेच्छा पूर्ण होण्यास नेहमीं एक स्त्री व एक पुरुष अशा दोन व्यक्ति लागतात व त्या दोघांचा एकमेकाशीं इतका निकट संबंध येतो कीं त्यांना एकमेकांविषयीं निदान त्या वेळेपुरतें कां होईना, अतिशय प्रेम वाटतें. कामेच्छा पूर्ण करून घेणें हा प्रत्येक मनुष्याचा हक्क आहे व कोणत्याही समाजाची आर्थिक, धार्मिक किंवा रूढिविषयक स्थिति जर या हक्काच्या आड येत असेल तर ती अवश्य बदलली पाहिजे. शिवाय, शारीरिक व मानसिक आरोग्याला अत्यंत आवश्यक अशी जी ही गोष्ट, ती अंधारांत, घाणेरड्या जागीं व दारू किंवा इतर मादक पदार्थांच्या निशेंत व्हावी ही गोष्ट अत्यंत अनिष्ट आहे. वेश्याव्यापार बंद करावा कीं न करावा व तें शक्य आहे कीं काय हा विचार बाजूला ठेवला तरी सद्यःस्थिति सुधारणें फार जरूर आहे हें उघड आहे.

या दृष्टीनें संकेतगृहांसंबंधींची पुढें दिलेली सूचना फार महत्त्वाची असून सर्वांनीं विचार करण्यासारखी आहे.

स्त्रीपुरुषांचा शरीरसंभोग (मग त्यांचा विवाह झालेला असो अगर नसो) ही एक अत्यंत पवित्र गोष्ट असल्यामुळें ज्यांना तो शक्य तितक्या सुशोभित व प्रसन्न ठिकाणीं करावयाचा असेल त्यांच्याकरितां सरकार किंवा म्युनिसिपॅलिटी यांनीं "संकेतगृहें" बांधावीं. या संकेतगृहांची व्यवस्था मानवी गुणधर्म समजून त्यांच्याबद्दल सहानुभूति बाळगणाऱ्या व्यवस्थापकां-च्याच हवालीं केलेली असावी व प्रसूतिगृहांप्रमाणेंच समाजहित संभाळणाऱ्या संस्थांतच त्यांची गणना व्हावी. या गृहांत कोणाही वयांत आलेल्या जोड-प्याला मज्जाव नसावा. या गृहांतील सर्व वातावरणच असें असावें कीं कामेच्छा पूर्ण करणें हें एक कांहीं मिनिटांचें पाशवी काम नसून त्यांत एक विलक्षण जादू भरलेली आहे व तें पवित्र काम दोन्ही व्यक्तींना कल्पनातीत सुख व आरोग्य देणारें आहे अशी प्रत्येकाची समजूत व्हावी. या गृहांतच "संततिनियमन" व "गुप्त रोगांपासून बचाव" यासंबंधाची माहिती देणारे स्त्री व पुरुष डॉक्टर असून त्या दोन्ही प्रकारचीं साधनेंही विकत मिळण्याची व्यवस्था तेथेंच असली पाहिजे. याशिवाय मुलें व्हावीं अशी इच्छा असलेल्या जोडप्यांची वैद्यकीय तपासणी या गृहांतच करून त्यांना योग्य तो सल्ला देण्याची व्यवस्था असावी. त्याचप्रमाणें खालच्या मजल्यावर भोजनाची व्यवस्था असून उत्तम प्रकारचीं स्नानगृहें ही असावींत. वरच्या मजल्यावरील खोल्यांचा उपयोग प्रत्येक जोडप्याला एक रात्रभर करण्याची परवानगी असावी व त्याबद्दल त्यांच्याकडून माफक भाडें घेण्यांत यावें. या खोल्यांत देखील भिंतींवर नामांकित चित्र-कारांनीं काढलेल्या चित्रांच्या प्रतिकृति, स्वच्छ चादरी व पांघरुणें असलेले पलंग, थोडीं फार फुलें, स्वतंत्र मोरी व शौचकूप इ० सोई असाव्या. शिवाय या गृहांतच संभाषण करीत बसतां येईल असे दिवाणखाने, वाचनालयें, रेडिओ, इत्यादि सोईही असणें जरूर आहे. अशा प्रकारचीं संकेतगृहें जर निदान प्रत्येक मोठ्या शहरांत होतील तर अविवाहित अशा स्त्रीपुरुषांच्या संभोगाला देखील एक निराळेंच वळण लागेल व वेश्यागमन करणारे लोक देखील अशा गृहांचा उपयोग करूं लागतील. घाणेरड्या जागीं कामेच्छा तृप्त करण्याची कोणाला हौस असते असें

नाहीं, व वेश्येला घेऊन कां होईना पण अशा संकेतगृहांत जर एखादा पुरुष गेला तर त्याला संतति व रोग हीं दोन्ही टाळतां येतील. इतकेंच काय पण सुट्टीच्या दिवशीं आपल्या बायकोला गाडी करून राणीच्या बागेंत किंवा ऑपोलो बंदरावर घेऊन जाणारा मध्यम स्थितींतील गृहस्थ सुद्धां आपली कामेच्छा तृप्त करण्याकरतां आपल्या बायकोसह जाऊन एकाद्या रात्रीपुरती संकेतगृहांतील एकादी सुंदरशी खोलीच कां भाड्यानें घेणार नाहीं ?

संकेतगृहांसंबंधींच्या योजनेची केवळ रूपरेषा वर दिलेली आहे. त्यांत पुष्कळांना निरनिराळे फेरफार सुचवतां येतील. उदाहरणार्थ मादक पदार्थांच्या नशेंत असलेल्या कोणत्याही स्त्रीपुरुषांस अशा प्रकारच्या संकेतगृहांत प्रवेश मिळणार नाहीं. त्याचप्रमाणें ज्यांचे कपडे पुरेसे स्वच्छ नसतील त्यांना भाड्यानें परटाकडून आलेले कपडे वापरण्यास मिळण्याची सोय संकेतगृहांतच करण्यासारखी आहे. अशा बारीक सारीक बाबी पुष्कळ सुचवतां येतील. परंतु मुद्द्याची गोष्ट म्हणजे रुग्णालयें, व्यायामशाळा, इत्यादि संस्था चालवणें आपलें कर्तव्य आहे असें ज्या सरकारला वाटतें त्यानेंच संकेतगृहांची सोय कां करूं नये ?

पत्रांचा सारांश

१.

सा. न. वि. वि. मासिकाचे अंक पोंचले. संततिनियमनाकरतां वड्या पाहिजे त्याला उघडपणें विकणें मला पसंत नाहीं. त्यांचा उपयोग डाक्टरांचे सल्ल्यानेंच झाला पाहिजे. त्या सरसकट सर्वांस विकणें म्हणजे कुमारिकांस व व विधवांस मोह पाडणें आहे व यानें त्यांची कामवासना मोकळी सुटेल. कुमारिकांचें कौमार्य नष्ट झाल्यावर सुद्धां त्या कुमारिका म्हणून समाजांत वावरतील. नीतिविरुद्ध समागमास गर्भधारणेची भीति ही मोठी अडचण असते. केवळ विवाहित स्त्रियांसच यांची विक्री व्हावी, व ती सुद्धां त्या गरीब किंवा रोगी असल्या तरच. तरी पण गर्भपातापेक्षां वड्या वापरणें बरें. परंतु या

वदयांमुळें जीवनद्रवाचा अपव्यय होतो. आपण मासिकांत म्हणतां त्याप्रमाणें वीर्य शरीरांत राहणें सर्वांस हानिकारक नसतें. जव्हां तें फाजील उत्पन्न होतें किंवा शरीरास त्याची जरूर नसते तेव्हां तें आपोआप (स्वप्नावस्थेंत) बाहेर पडतें, व त्यामुळें धोका नाहींसा होतो. ... ...

आपला

× × ×

[१. कोणाला किती मुलें व्हावीं, हें ठरवण्याचा हक्क डॉक्टरांस काय म्हणून ? हें ज्याचें त्यास ठरवतां आलें पाहिजे. २. गर्भधारणेला भिऊन ज्या कुमारिका किंवा विधवा नीतिमान रहात असतील त्यांची बळमळीत नीति केव्हांतरी ढांसळणारच, व त्या एकतर गर्भपात करणार, किंवा त्यांच्यामुळें सर्व आप्तइष्टांची बदनामी होणार. त्यापेक्षां संततिनियमन निःसंशय चांगलें. ३. आपण डॉक्टर आहांत, परंतु यासंबंधीं विचार केलेला दिसत नाहीं. वीर्य हें शुक्रजंतु व कांहीं मांसपेशींचा स्राव यांचें मिश्रण असतें. हें मिश्रण शरीरांत आगाऊ तयार नसतें; कांहीं शारीरिक किंवा मानसिक कारणानें ज्यावेळीं इंद्रियास चालना मिळेल तेव्हांच हें तयार होतें व लगेच त्याचें स्खलन होतें. जें तयारच नसतें, त्याचा शरीरास उपयोग कसा होणार ? शुक्रजंतु अधिक तयार झाल्यास व इतर पेशी अधिक फुगून गेल्यास बहुधा स्वप्नावस्था होते, हें खरें, परंतु ती न झाल्यास डोकें दुखणें वगैरे होतात, असा पुष्कळांस अनुभव आहे. स्वप्नावस्थेनें धोका नाहींसा होतो असें म्हणतां यावरून धोका आहे हें आपण कबूलच करतां. मग स्वप्नावस्थेची वाट कां पहावयाची ? नैसर्गिक संभोगापेक्षां स्वप्नावस्था बरी समजण्याचें कांहीं कारण दिसत नाहीं.–सं.]

२.

वि. वि. 'संततिनियमन' या पुस्तकाची दुसरी आवृत्ति मी फार काळजीपूर्वक दोनदोन तीनतीन वेळ वांचली व त्यांतील विचारसरणीही मला पसंत पडली. इंग्लिशमधील Married Love, Wise Parenthood, Radiant Motherhood, या पुस्तकांसारखी

विस्तृत माहिती या पुस्तकांत नाहीं ही मात्र खेदाची गोष्ट आहे, तरी अर्धवट इंग्लिश जाणणाऱ्या किंवा इंग्लिश नच जाणणाऱ्या इसमास चांगलाच उपयोग करतां येईल. मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें कीं आपलेकडील हिंदुसमाज विशेषतः स्त्रीसमाज यापैकीं एकही गोष्ट करण्यास तयार नाहीं. अपवाद असेल तो भाग निराळा.

एक गोष्ट विचारण्याची ती ही कीं संततिनियमन, आवृत्ति दुसरी, पृष्ठ ६९ मध्यें, ३. रेतवाहक नलिकांचा छेद, या पॅरेग्राफमध्यें "यास क्लोरोफॉर्मची जरूर नसते. त्यानें एकंदर प्रकृतीवर अत्यंत हितावह परिणाम होतो इतकेंच नव्हे तर त्यापासुन कामवासना बिलकूल कमी होत नाहीं व ती तृप्त करण्याची शक्तीही पूर्ववत राहते" वगैरे वगैरे. यासंबंधानें असा प्रश्न विचारावयाचा आहे कीं, जर रेतवाहक नलिकांचा छेद केला म्हणजे मग पुरुषाचें वीर्यच बाहेर पडणार नाहीं, अर्थात वीर्याचा जो एक तऱ्हेचा फायदा स्त्रीचे शरीरास मिळावयाचा आहे तो मिळणार नाहीं असें होईल. तर मग हा प्रयोग जो सांगितला आहे तो फक्त रोगी लोकांकरितांच आहे असेंच समजावयाचें कीं काय? संतति अजिबात बंद होणें घडेल परंतु त्यामुळें वर जी शंका मी दर्शविली आहे ती खरी किंवा नाहीं, व तीवर उपाय काय? यासंबंधीं आपला अनुभव कळवावा.........

आपला

× × ×

[१. ज्या इंग्रजी पुस्तकांचीं नांवें आपण दिलीं आहेत त्या धर्तीवर लिहिलेलें पुस्तक बरेंच मोठें झालें असतें, व त्याची किंमतही जास्त ठेवावी लागली असती. केवळ मराठी वाचणारांस स्वस्त पुस्तकेंच पाहिजे असतात. २. ज्या स्त्रीस फाजील संततीपासुन त्रास होतो, तो हे उपाय करण्यास तयार होते असा आमचा अनुभव आहे. याप्रमाणें पुष्कळ स्त्रिया आमचेकडून माहिती व सामग्री घेऊन गेलेल्या आहेत. कित्येक पुरुषांस या विषयाची इतकी लाज वाटते कीं ते स्वतःच्या बायकोजवळ सुद्धां यासंबंधीं बोलावयास लाजतात, व ही स्त्रियांची चूक म्हणतां येणार नाहीं. त्रास होऊं लागला म्हणजे

मनाची तयारी तेव्हांच होते. ३ वीर्य हें अनेक द्रवांचें मिश्रण असतें. रेतनलिकांचा छेद केल्यानें शुक्रजंतूंचा मार्ग खुंटतो, व कांहीं दिवसांनीं त्यांची उत्पत्तीच बंद होते, परंतु वीर्यांतील इतर रस कायम असल्यामुळें रेतस्खलन नेहमीप्रमाणेंच होतें, त्यांत फरक भासत नाहीं.—सं.]

३

सा. न. वि. वि. आमची एक दूरची नातेवाईक विधवा असून मास्तरीण आहे. ती सच्छील आहे परंतु तरुण असल्यामुळें तिला कामवासना आवरत नाहीं. तरी पुरुषाच्या मदतीशिवाय ती तृप्त करण्यासारखें कांहीं अप्यॅरेटस् (यंत्र) असल्यास कळवावें.

आपला

× × ×

[मागें अशा पत्रांस उत्तर दिलेंच आहे. नैसर्गिक प्रकारापेक्षां कोणताही कृत्रिम मार्ग प्रकृतीस तर हितावह नाहींच परंतु त्यानें नीतीचें रक्षण होतें असेंही आम्हांस वाटत नाहीं. सततिनियमनाचे व रोगांपासून बचावाचे मार्ग माहीत असल्यास नैसर्गिक संभोग प्रकृतीस बरा. सं.]

एका वर्गणीदारानें दिलेला एका अंकाच्या छपाईचा खर्च वजा जातां या मासिकाच्या पहिल्या वर्षी संपादकास रु. ५६५ नुकसान आलें. प्रतिवर्षी असें नुकसान सोसणें आमचे आटोक्याबाहेरचें आहे. या वर्षी दोन वर्गणीदारांनीं दुप्पट वर्गणी भरून दोन प्रती घेण्याचें ठरविलें आहे. तसेंच एकानें ६ प्रती घेण्याचें ठरविलें आहे, याबद्दल संपादक त्यांचा अत्यंत आभारी आहे. जास्त प्रती घेणें व नवीन वर्गणीदार मिळवून देणें हे मदतीचे सर्वांत चांगले मार्ग आहेत. शक्य असल्यास यांपैकीं एक करावें अशी वाचकांस विनंति आहे.

× × × ×

कोणातरी पुरुषाची नोकर झाल्याशिवाय स्त्रीला अपत्याचा हक्क नाहीं या अनन्वित बंधनाविरुद्ध सर्व स्त्रिया मनांत जळफळत असतात. (बर्नार्ड शॉ.)

नवीन लेखांतील विचार.

ज्यांचे गरीबीमुळें हाल होतात त्यांना आपली उणीव कळते, परंतु ज्यांचे प्रेमाभावामुळें किंवा कामवासना अतृप्त राहिल्यामुळें हाल होतात, त्यांना पुष्कळ वेळां हें कळत नाहीं. (डॉ. रॉबिन्सन्)

* * *

धार्मिक दुराग्रह सोडून देऊन शास्त्रीय रीतीनें गुप्त रोगांचा विचार व उपाय केल्यास दहा वीस वर्षांत या रोगांचा नायनाट करतां येईल. (डॉ. रॉबिन्सन)

* * *

गुप्त रोगांचा प्रतिबंध करतां येतो काय, असें रोग्यानें विचारल्यास माझें मत (करतां येतो असें) मी त्याला सांगतों. ब्रह्मचर्याचा आपल्या प्रकृतीवर काय परिणाम होईल असें त्यानें विचारल्यास डॉक्टर व मानसशास्त्रज्ञ या दृष्टीनें मी उत्तर देतों. विवाहव्यतिरिक्त संभोगाविषयीं नीतिदृष्ट्या तुमचें काय मत आहे, असें त्यानें विचारल्यास, रोगी व डॉक्टर या संबंधांत हा प्रश्न उपस्थितच होत नाहीं, असें मी सांगतों. रोगी डॉक्टराकडे जातो, धर्मोपदेशक किंवा नीत्युपदेशकाकडे जात नाहीं. (डॉ. रॉबिनसन.)

* * *

पुष्कळ देशांत परराष्ट्रीय वेश्यांविरुद्ध विशेष प्रकारचे कायदे आहेत. कांहीं देशांत त्यांस येऊं देत नाहींत, व कांहीं देशांतून त्यांस हांकून देतात. फ्रान्समध्यें त्यांस वेश्यागृहांत राहूं देत नाहींत. वस्तुतः याचा परिणाम त्यांना हांकून दिल्यासारखाच होतो, कारण कोणाही परकी मनुष्यास फ्रान्समध्यें दोन महिन्यांवर रहावयाचें असल्यास त्यास पोलिसाकडून पास घ्यावा लागतो, व हा पास वेश्यांस देत नाहींत.

वेश्यांचा स्वतःच्या देशांत धंदा चालत नाहींसा झाल्यामुळें त्या परदेशीं जातात, व त्यांस परत स्वदेशीं पाठवल्यास त्यांचा धंदा न चालल्यामुळें त्या सुमार्गी लागतील हें म्हणणें फोल आहे. प्रत्येक देशांतील परदेशी वेश्या नाहींशा होऊन त्यांऐवजीं बाहेर गेलेल्या वेश्या परत येतील, व यामुळें स्वदेशीस उत्तेजन दिल्यासारखें होईल हें मात्र खरें !

* * *

'भारतमित्र' मासिकांतील एक लेखक म्हणतातः—

'व्यभिचार हा अनादिकालापासून चालू आहे; महाभारतांत नागरिकांच्या सोईकरतां भीष्माचार्यांनीं ठिकठिकाणीं वेश्यागृहें बांधल्याचा उल्लेख आहे. तेव्हां

तो नाहींसा करण्याकरितां पुरुषांनींच आपलें मन स्वाधीन ठेवलें पाहिजे; त्या बद्दल प्रयत्न केले पाहिजेत.

(मग भीष्माचार्यांची अक्कल कोठें गेली होती ? ते स्वतः आमरण अविवाहित राहिले परंतु त्यांनीं वरील लेखकाप्रमाणें सर्वांस मनोनिग्रहाचा उपदेश न करतां वेश्यागृहें बांधलीं, हें कसें ?–सं.)

हेच लेखक पुढें म्हणतात:—

'संततिनियमनाची हल्लीं चळवळ चालली आहे, आणि त्याप्रीत्यर्थ अनेक कृत्रिम उपायांचा अवलंब करावा असें बऱ्याच जणांचें मत आहे. परंतु ही पाश्चात्य पद्धति आम्हां पौर्वात्यांस उपयोगी नाहीं. येथेंही वर सांगितलेला उपायच श्रेष्ठ आहे आणि ही गोष्ट कांहीं वाटते तितकी कठिण नाहीं. आजपर्यंत कित्येक लोकांनीं ही गोष्ट अमलांत आणली आहे, आणि आणीतही आहेत. आमरण ब्रह्मचर्यानें राहिलेले कितीतरी साधू, संन्यासी वगैरे आढळून येतील. मग वरील कारणास्तव थोडेसें मनःसंयमन करणें जड जाईल असें वाटत नाहीं; पण निग्रह मात्र केला पाहिजे.'

(कांहीं लोक नपुंसक असतात, व बरेच लोक खोटें बोलतात. पुष्कळ साधू अन्नाशिवाय जगण्याचें ढोंग करतात, तेंही हिंदुस्थानांत पचतें, त्याचप्रमाणें ब्रह्मचर्याचें ढोंगही पचतें. सामान्य माणसांसारखीच कामवासना असून सुद्धां ब्रह्मचर्यानें राहणारा मनुष्य मूर्ख तर खराच, परंतु अशा प्रकारचे मूर्ख फारसे सांपडत नाहींत. समजा अशा रीतीनें निग्रहाचा दुरुपयोग करणारा एखादा असलाच, तरी ही गोष्ट कठिण नाहीं असें म्हणण्यास कोणताही आधार नाहीं. पांच मण वजन उचलणारे कित्येक हमाल असतात, म्हणून हें सर्वांस साधेल असें म्हणणें सयुक्तिक होईल काय ?

कृत्रिम उपाय पाश्चात्य आहेत, हें विधानच खोटें आहे, असें आम्हीं 'संततिनियमन' या पुस्तकांत दिलेल्या संस्कृत उताऱ्यांवरून दिसून येईल. शिवाय पाश्चात्य म्हणजे वाईटच असलें पाहिजे असें नाहीं. –सं.)

हेच लेखक पुढें म्हणतात :—

'विलायतेंतील एक बड्या उमरावाच्या स्त्रीनें युद्धफंडाकरितां आपल्या चुंबनाचा विक्रय केल्याचें प्रसिद्ध झालें होतें; याप्रमाणें पुरुषाच्या चुंबनाचा विक्रय झाला असता काय ? यावरूनच स्त्रियांचें श्रेष्ठत्व सिद्ध होतें.'

(याला इतकें लांब जाण्याचें कारण नव्हतें. वेश्या स्त्रियाच असतात व त्याचा शरीरविक्रय सर्व देशांत होतो. यावरून त्यांचं श्रेष्ठत्व कधींच सिद्ध झालें आहे ! –सं.)

289532